महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:-

Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.१३०/एसएम-२

दिनांक:- १६ फेब्रुवारी, २०२३.

# इरादा पत्र

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
सौ. मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी, नाशिक.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी इरादापत्र...

सौ. मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी, नाशिक संचलित एम. के. डी. इंग्लिश मिडिअम स्कूल, गट क्र.५७, विरचक, ता.जि. नंदुरवार.

संदर्भ :- विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.शिउसं/ नावि/माध्य-२/नवीन शाळा/२०२२/२१३५३/३५२, दि. २९.१०.२०२२.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सौ. मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी, नाशिक या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून एम. के. डी. इंग्लिश मिडिअम स्कूल, गट क्र.५७, विरचक, ता.जि. नंदुरवार ( प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ. १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्यास मान्यता मिळण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. वर नमुद केलेल्या विषयावरील आपल्या अर्जाच्या संदर्भात, आपणांस असे कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सौ. मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी, नाशिक संचलित एम. के. डी. इंग्लिश मिडिअम स्कूल, गट क्र.५७, विरचक, ता.जि. नंदुरवार ( प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ. १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा) या स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळेच्या मान्यतेकरिता शाळेचे काम सुरु करण्यास पुढील अटीं व शर्तीसह इरादा पत्र देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

(एक) सदर इरादा पत्र, अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याशिवाय, मान्यता पत्राची हमी देत नाही.

(दोन) सदर इरादा पत्राच्या आधारे, नोंदणीकृत संस्था किंवा न्यास किंवा कंपनीला शाळा / दर्जावाढीचे वर्ग सुरू करता येणार नाही.

M.K.D. English Medium School (CBSE) Nandurbar 425412
Sau. Mina Kishor Darade Education Society's Nashik
Nandurbar

Principal
M.K.D. English
Medium School (CBSE)
Nandurbar 425412

(तीन) सदर इरादा पत्राचा, सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई. / आय.जी.सी.एस.ई. / आय.बी., इत्यादी मंडळांच्या संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र म्हणून वापर करता येणार नाही.

(चार) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ आणि अधिनियमान्वये व नियमांन्वये शासनाने वेळोवेळी दिलेले निदेश, यांमध्ये विहित केल्याप्रमाणे, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, पायाभूत व भौतिक सुविधा (उदा. स्वच्छतागृहे, पेयजल सुविधा, प्राचार्य व कर्मचारी वर्ग कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, इत्यादी) यांसंबंधी मानके, अटी व शर्ती यांचे अनुपालन करणे अनिवार्य असेल.

(पाच) वर नमूद केलेल्या सुविधांचे अनुपालन केल्यानंतर, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, संबंधित जिल्ह्याच्या क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडे मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करणे, ही संस्थेची किंवा न्यासाची किंवा कंपनीची जबाबदारी असेल.

(सहा) जर १८ महिन्यांच्या आत, मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करण्यात शाळा व्यवस्थापन अपयशी ठरत असेल तर, इरादा पत्र रद्द होईल. इरादा पत्राचा कालावधी, कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाऊ शकणार नाही.

(सात) इरादा पत्र दिल्यानंतर, प्रस्तावित शाळेचे ठिकाण बदलता येणार नाही. जर व्यवस्थापनाने, शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणच्या मान्यता पत्रासाठी अर्ज केला असेल तर, इरादा पत्र रद्द होईल.

(आठ) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमापकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले इरादा पत्र रद्द करू शकेल.

(नऊ) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या "अनुसूची ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवणे आवश्यक राहील.

प्र. द. पडोळे

(प्रदिप पडोळे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी-

आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

विभागीय शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग, नाशिक.

शिक्षणाधिकारी, प्राथमिक / माध्यमिक, जि.प. नंदुरबार.

निवड नस्ती एसएम-२/(अ.क्र.१३०/२०२३).

K.K.D. English Medium School (CBSE) Nandurbar 425412
Sau. Mina Kishor Garade Education Society's Nashik

Principal
K.K.D. English Medium School (CBSE)
Nandurbar 425412